# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः28.02.2025** **वारःशुक्रवार**

---

महाकुंभ म्हणजे एकतेचा महायज्ञ असल्याचे पंतप्रधानांचे गौरवोद्गार

देशातील युवा पिढीकडे जागतिक समस्या सोडवण्याची क्षमता असल्याचं लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांचं प्रतिपादन

मराठी भाषा गौरव दिन राज्यभरात उत्साहात साजरा; कवीश्रेष्ठ कुसुमाग्रजांचं शिरवाडे वणी; कवितांचं गाव म्हणून घोषित

आणि

पुण्यातील लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपीला अटक

**पंतप्रधानमहाकुंभ**

प्रयागराजमध्ये झालेला महाकुंभ हा एकतेचा महायज्ञ ठरला, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाकुंभ मेळ्याची प्रशंसा केली आहे. देशाला आपल्या सांस्कृतिक वारशाचा अभिमान असून देश एका नव्या उर्जेनं पुढे जात आहे, असं पंतप्रधानांनी म्हटलं आहे. समाज माध्यमावर लिहीलेल्या एका लेखात पंतप्रधानांनी महाकुंभबाबतचे आपले विचार व्यक्त केले आहेत. आपल्या देशाचं नवीन भविष्य घडवण्याच्यादृष्टीनं परिवर्तनाच्या युगाची ही नांदी असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं आहे. महाकुंभच्या यशस्वी आयोजनात योगदान दिलेल्या सर्वांचे मोदी यांनी आभार मानले आहेत. त्यांचे कष्ट, प्रयत्न आणि निर्धार यामुळेच हे शक्य झाल्याचं पंतप्रधान मोदींनी म्हटलं आहे. समाजाच्या प्रत्येक वर्गातून, निरनिराळ्या क्षेत्रातले लोक महाकुंभच्या निमित्ताने एकत्र आले असं मोदी यांनी म्हटलं आहे.

**ओमबिर्ला-संतोष-माधवी**

भारतीय तरूण जगात सर्वात बुद्धिमान आणि सामर्थ्यशाली असून जगातील मोठ्या समस्या सोडवण्याची क्षमता त्यांच्याकडे आहे, असं प्रतिपादन लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी काल पुण्यात केलं. भारती अभिमत विद्यापीठाचा 26वा पदवी प्रदान समारंभ बिर्ला यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला; त्यावेळी ते बोलत होते. देशाच्या विकासात पुण्यानं मोठं योगदान दिलं असून पुणे ही समाज सुधारकांची भूमी असल्याचं बिर्ला म्हणाले.

**<u>मराठी भाषा गौरव दिन</u>**

**<u>इंट्रो –</u>**

मराठी भाषेचा सन्मान करत मराठी जगवली, जोपासली पहिले असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केलं. मराठी भाषा गौरव दिनी मुंबईतील गेटवे ऑफ इंडिया इथं आयोजित; साहित्यिकांच्या गौरव आणि पुरस्कार सोहळ्यात ते काल बोलत होते. उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री मंगलप्रभात लोढा, मराठी भाषा मंत्री उदय सामंत, यांच्यासह साहित्य क्षेत्रातील नामवंत मान्यवर यावेळी उपस्थित होते. यंदाचा विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक दिवंगत रा रं बोराडे यांना जाहीर झाला आहे; त्यांचं नुकतंच निधन झाल्यामुळे त्यांच्या कन्या प्रेरणा दळवी यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. राज्य सरकार मराठी भाषेच्या संवर्धनासाठी कटीबद्ध असून, निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी दिली.

राज्यात सर्वत्र काल मराठी भाषा गौरव दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. ऐकुया त्याबाबतचा वृत्तांत

**<u>स्क्रिप्ट –</u>**

मराठी भाषा गौरव दिनाचं औचित्य साधून कुसुमाग्रज याचं नाशिक जिल्ह्यातलं शिरवाडे वणी हे गाव कवितांचं गाव म्हणून घोषित करण्यात आलं. शिरवाडे इथं पुढच्या वर्षापासून दोन दिवसीय कुसुमाग्रज महोत्सवाचं आयोजन करण्यात येईल, अशी घोषणा मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी केली. नवी दिल्लीतल्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठात कुसुमाग्रज मराठी अध्यासन सुरू करण्यात येईल असं सामंत म्हणाले. नाशिक शहरात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त ग्रंथदिंडी, ग्रंथोत्सवाचं आयोजन केलं होतं.

पुण्यात शनिवारवाडा आणि लाल महाल इथं विविध संत,राष्ट्रपुरुष, समाज सुधारक, शिवाजी महाराज, झाशीची राणी, संत ज्ञानेश्वर, क्रांतिकारकंतसेच थोर मराठी साहित्यिकांच्या वेशभूषेतल्या शेकडो शालेय विद्यार्थ्यांनी मराठी अभिमान गीत आणि महाराष्ट्र गीत गायलं.

रमणबाग प्रशालेत साहित्यिक ओळखा आणि साहित्यकृती सांगा, हा उपक्रम झाला. विविध साहित्यिकांचे मुखवटे घातलेली मुलं विद्यार्थ्यांसमोर आली, समोर बसलेल्या विद्यार्थ्यांनी त्यांची नावं आणि निवडक साहित्य कृती सांगितल्या.

अक्षर रसिक सुलेखन वर्गानं माय मराठी अक्षरोत्सव, या विषयावर शालेय विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळेचं आयोजन केलं होतं. २० शाळांमधल्या अडीच हजार विद्यार्थीना याचा आनंद घेतल्याचं सुलेखन अभ्यासक शैलेश जोशी यांनी सांगितलं.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेनंही मराठी भाषा दिनाचं औचित्य साधून सुलेखन कार्यशाळा घेतली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. यावेळी छत्रपती शंभुराजे साहित्य पुरस्कारांचं वितरण करण्यात आलं.

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त रत्नागिरीत स्वातंत्र्यवीर सावरकरांना ज्या कारागृहात ठेवण्यात आलं होतं, त्या विशेष कारागृहापासून सावरकर नाट्यगृहापर्यंत ग्रंथदिंडी काढण्यात आली. पारंपरिक वेशभूषेतील विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या सहभागाने, ढोल, लेझीमच्या तालात झालेल्या या ग्रंथ दिंडीच्या सांगता कार्यक्रमात उपस्थित साहित्यिकांचा मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

सांगली जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयात ग्रंथप्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं होतं.

आकाशवाणीच्या बातम्यांसाठी आमच्या ठिकठिकाणच्या वार्ताहरांसह सुरेखा जोशी पुणे.

**<u>राष्ट्रीयविज्ञानदिन</u>**

राष्ट्रीयविज्ञानदिनदेशभरातआज राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जात आहे. प्रख्यात भौतिकशास्त्रज्ञ सर सी. व्ही.रामन यांनी 'रामन इफेक्ट'चा शोध लावल्याच्या स्मरणार्थ दरवर्षी २८ फेब्रुवारी रोजी हा दिवस साजराकेला जातो.

या अभूतपूर्व शोधासाठी सर रामन यांना १९३० मध्ये नोबेल  परितोषिकांनं सन्मानित करण्यात आलं. राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्तदेशभरात विविध वैज्ञानिक विषयांवर आधारित उपक्रमांचं आयोजन करण्यात येतं.

**राज्यपालवनहक्क**

वनहक्क कायद्याची कालबद्धपणे अंमलबजावणी करण्यासाठी वैयक्तिक आणि सामूहिक वन हक्कांचे प्रलंबित दावे तातडीनं निकाली काढण्यात यावेत असे निर्देश राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी दिले आहेत. राज्यपालांनी काल मुंबईत वनहक्क कायदा, २००६च्या अंमलबजावणीचा आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते. वन हक्क लाभार्थींची आधारकार्ड जोडणी, प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेत नोंदणी आदी कामंही विशेष शिबिर घेऊन पूर्ण करण्याचे निर्देश राज्यपालांनी दिले.

**परिवहनमंत्री**

राज्यातल्या सर्वच बसस्थानकांचं आणि आगारांचं तातडीनं सुरक्षा परीक्षण करावं असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. बसस्थानकात आणि आगारांमधल्या विनावापर उभ्या असलेल्या बस आणि परिवहन कार्यालयांच्या कारवाईमध्ये जप्त केलेल्या वाहनांची १५ एप्रिलपर्यंत विल्हेवाट लावण्याचे निर्देश त्यांनी दिले. बसस्थानकांमधील महिला प्रवाशांच्या सुरक्षा विषयक आढावा बैठकीत ते काल बोलत होते.  महिला प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता बसस्थानकावरच्या महिला सुरक्षा रक्षकांची संख्या वाढवावी, परिवहन  विभागाच्या राज्यभरातल्या सर्वच स्थानकं आणि आगारांमध्ये सीसीटीव्हीची अद्ययावत यंत्रणा उभारावी, नवीन बसमध्ये सीसीटीव्ही बसवावे, बसमध्ये जीपीएस यंत्रणा बसवण्याचं काम गतीनं पूर्ण करावं, स्थानिक पोलिसांची मदत घेऊन बसस्थानकावर त्यांची गस्त वाढवावी अशाही सूचना परिवहन मंत्र्यांनी केल्या.

**बक्षीस**

दरम्यान स्वारगेट बस स्थानकातल्या अत्याचार प्रकरणातल्या आरोपीला पुणे पोलिसांनी अटक केल्याचं वृत्त नुकतंच हाती आलं आहे. आरोपी दत्तात्रय गाडे याला शिरूर तालुक्यात अटक करण्यात आल्याचं वृत्त dd news वृत्त वाहिनीनं दिलं आहे.

**मस्साजोग आरोप पत्र**

मसाजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी बीडच्या विशेष मोक्का न्यायालयात गुन्हे अन्वेषण विभाग अर्थात सीआयडीनं आरोपपत्र दाखल केलं आहे. सीआयडीच्या तपासानुसार, खंडणी प्रकरणात अडथळा आणल्यामुळे संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे. बीडच्या मसाजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची गेल्या 9 डिसेंबर रोजी अपहरण करून हत्या करण्यात आली होती. त्यानंतर विविध संघटनांतर्फे राज्यभर आंदोलनं करण्यात आली.

**<u>संमेलन</u>**

महाराष्ट्र गांधी स्मारक निधीच्या पुढाकाराने येत्या ७ ते ९ मार्च या कालावधीत पुण्यातील गांधी भवन इथं 'गांधी विचार साहित्य संमेलन आयोजित करण्यात आलं आहे. या संमेलनाचे प्रमुख निमंत्रक, महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष डॉ.कुमार सप्तर्षी, यांनी नुकतीच पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. ज्येष्ठ साहित्यिक सुरेश द्वादशीवार या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आहेत. खासदार मनोज कुमार झा यांच्या हस्ते या संमेलनाचं उद्घाटन होणार आहे. गांधीजींचे विचार आणि जीवनासंबंधी ८ परिसंवाद या संमेलनात होणार असून २५ मान्यवर त्यात मार्गदर्शन करणार आहेत.

**<u>प्राध्यापकभरती</u>**

राज्यातल्या अकृषी विद्यापीठांमधल्या अध्यापक पदांच्या भरतीला शासनानं मान्यता दिल्याची माहिती उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली. निवड प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि निष्पक्षता असावी यासाठी नवीन कार्यपद्धतीचा अवलंब केला जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<u>हवामान</u>**

कोकणात आज तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता असून इतरत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**